# विश्वस्त सिद्धांताचे- नव सैद्धांतिक प्रारूप

**प्रा. पाटील प्रमोद जगन्नाथ,** राज्यशास्त्र विभाग, माऊली महाविद्यालय, वडाळा ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर

---

**प्रस्तावना-**

महात्मा गांधी यांच्यावर रस्किनच्या विचारांचा प्रभाव होता. प्रत्येकाला उपजीविकेसाठी कराव्या लागणाऱ्या श्रमाचे मूल्य समान असले पाहिजे, असे रस्किनचे मत होते. रस्किनच्या 'अन् टु धिस लास्ट' या पुस्तकाचा प्रभाव गांधींवर होताच. त्यातील सर्वात महत्त्वाच्या तत्त्वांप्रमाणे गांधी आर्थिक समानतेचा आग्रह धरतात. गरीब-श्रीमंत, बुद्धिजीवी-श्रमजीवी जनतेत फरक करीत नाहीत. विषमतेवर आधारलेला समाज कधीही अहिंसक राहू शकत नाही असे गांधीजींचे मत होते. आर्थिक समतेसाठी प्रयत्न करणे म्हणजे भांडवल व श्रम यांच्यामध्ये संघर्ष उभा करणे असा अर्थ होत नाही. जे थोडे धनिक देशातील प्रचंड संपत्ती बाळगून आहेत त्यांचा स्तर काही प्रमाणात खाली आणणे व जे अत्यंत हालाखीच्या स्थितीत जीवन जगत आहेत त्यांची पातळी उंचावणे असा आर्थिक समतेचा अर्थ गांधींना अभिप्रेत होता. (गांधी मो.क.(अनुवादित- खेर व्ही.बी.(१९५७): १४०) गांधी यांच्या मते, श्रीमंत व गरीब यांच्यातील तफावतीप्रमाणेच श्रमजीवी व बुद्धिजीवी यांच्यातील देखील आर्थिक विषमता मानवाच्या दृष्टीने घातक आहे. म्हणून डॉक्टर, सुतार, वकील, शिक्षक, भंगी यांचे मजुरीचे दर सारखेच असले पाहिजेत. गांधी यांच्या मते, "भौतिक श्रम हे सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणारे असतात, आनंददायी असतात पण बौद्धिक अन्न हे आपण जे धान्य खातो त्याला पर्याय देऊ शकत नाही. भौतिक श्रमाचे ही तसेच आहे. जे शरीरश्रमापेक्षा श्रेष्ठ असले तरी ते त्याला पर्याय नाही. म्हणून समाजाच्या पालनपोषणासाठी शारीरिक श्रम करणे. हे प्रत्येक माणसाचे जन्मसिद्ध कर्तव्य आहे." (पंडित, (१९८३): २४५)

थोडक्यात गांधीजी आपण कोणत्याही प्रकारचे श्रम करणारे असा, आपण दैनंदिन उपजीविकेसाठी शारीरिक श्रम केलेच पाहिजे असा संदेश देतात. त्यांच्या मते, वरिष्ठ वर्गाच्या गरजा कनिष्ठवर्गापेक्षा वेगळ्या आहेत असे म्हणणे मांडून कोणी गरीब श्रीमंतीचं समर्थन करू शकत नाही व ते कोणी करूही नये. आज शहरी व ग्रामीण जीवनातील तफावत ही अत्यंत हृदयद्रावक आहे. गरिबांची मोठ्या प्रमाणामध्ये शहरी लोकांकडून पिळवणूक केली जाते. (गांधी, (१९५२): १५१,१५२) त्यांच्या मते, बुद्धिमान व्यक्तींना जादा कमाई करण्याची संधी मिळेल परंतु त्यांनी आपली अतिरिक्त कमाईची रक्कम समाज कल्याणासाठी तिचा वापर करावा. ज्या पद्धतीने एखाद्या घरामध्ये चार भावंडे आपली कमाई एकत्रित करून संपूर्ण कुटुंबासाठी त्याचा वापर करतात त्याच पद्धतीने समाजातील अतिरिक्त उत्पन्न मिळविणाऱ्या व्यक्तींनी ती सामाजिक कार्यासाठी वापरावी असे ते स्पष्ट करतात. (यंग इंडिया, (२६/११/१९३१):३६८) श्रमिकांना कमी प्रतीचा दर्जा देण्यात येतो मात्र विणकर, कृषक आणि शाळेतील शिक्षक यांच्या मुलांमध्ये कोणताही भेद असणे चालणार नाही, असे गांधी स्पष्ट करतात. प्रत्येकाला उपजीविकेसाठी आवश्यक असलेली साधनसामग्री उपलब्ध झाली पाहिजे. एखाद्या व्यक्तीच्या उपजीविकेसाठी लागणारा खर्च अधिक आहे म्हणून त्याला जास्त पैसा देणे. एखाद्या गरीब व्यक्तीला गरजा कमी आहेत म्हणून कमी पैसा देणे हे योग्य नाही, असे गांधी स्पष्ट करतात. प्रत्येक व्यक्तीला संतुलित भोजन, राहण्याकरता नीटनेटके घर, मुलांच्या शिक्षणाची योग्य सोय, आरोग्य चिकित्सा उपलब्ध होणे गरजेचे आहे. सर्वांना समान संधी प्राप्त झाल्यास समान उन्नती होईल असे गांधी स्पष्ट करतात. गांधीजींच्या मते, आर्थिक समतेच्या प्रस्थापनेसाठी समान वितरण पद्धतीचा आपण स्वीकार केला पाहिजे. मूठभर लोकांच्या हाती भांडवल गोळा होण्याची आवश्यकता नाही. उलट ते भांडवल अशाप्रकारे वितरित करणे आवश्यक आहे की देशातील साडेसात लाख गावांमधून ते उपलब्ध व्हायला हवे. (यंग इंडिया, (२३/३/२०२१): ९३) समान वितरण हा माझा आदर्श आहे. परंतु हा आदर्श साध्य करणे माझ्या दृष्टीत पुढच्या टप्प्यात नाही, त्यामुळे मी न्याय वितरणासाठी प्रयत्न करेन. न्याय वितरण म्हणजे मानवाच्या स्वाभाविक गरजांच्या पूर्ततेचे साधन असावे यापेक्षा वेगळे काही नसावे. असे गांधीना अपेक्षित होते.

आर्थिक समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टिकोनातून व गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी दूर करण्यासाठी गांधीजी विश्वस्त सिद्धांताची मांडणी करतात. सदर संशोधनामध्ये गांधीजींची विश्वस्त सिद्धांताबाबतची भूमिका व त्यामध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर विशेषतः जगभर समाजवादी विचारांचा अधिक प्रभाव वाढू लागल्यानंतर गांधीजींनी विश्वस्त सिद्धांतामध्ये केलेल्या बदलाचा अभ्यास सदर संशोधन पेपर मध्ये केला जाणार आहे.

**गृहीतके –**

१) महात्मा गांधीजींनी विश्वस्त सिद्धांताद्वारे आर्थिक समता प्रस्थापनेचा प्रयत्न केला.

२) विश्वस्त सिद्धांताद्वारे मानवतावादी अर्थव्यवस्थेचा गांधीजींनी आग्रह धरला.

३) विश्वस्त सिद्धांताद्वारे गांधीजी श्रीमंत व गरीब वर्गामध्ये आर्थिक दरी जी मोठ्या प्रमाणात आहे ती कमी करू इच्छिता.

४) विश्वस्त सिद्धांताद्वारे गांधीजी विश्वाचे सामुदायिक कल्याण साधू इच्छितात.

५) गांधीजींनी विश्वस्त सिद्धांताच्या प्रारूपामध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर बदल केला.

६) महात्मा गांधीची आर्थिक समता हे अहिंसक समाज निर्मितीचे साधन मानतात.

**उद्दिष्टे-**

१) महात्मा गांधीजींनी विश्वस्त सिद्धांताद्वारे आर्थिक समता प्रस्थापनेचा प्रयत्न केला का? ते पाहणे.

२) विश्वस्त सिद्धांताद्वारे श्रीमंत व गरीब वर्गातील दरी दूर करण्याच्या दृष्टीने गांधींनी केलेल्या मांडणीचा अभ्यास करणे.

३) गांधीजींनी विश्वस्त सिद्धांताच्या प्रारूपामध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर केलेल्या बदलाचा अभ्यास करणे.

४) गांधीजींच्या विश्वस्त सिद्धांताची समकालीन प्रस्तुतता अभ्यासणे.

**संशोधन पद्धती-**

प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये ऐतिहासिक व ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा वापर संशोधकाकडून केला जाणार आहे. ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथांचा तसेच प्रकाशित, अप्रकाशित प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनांच्या आधार सदर संशोधन पेपरसाठी घेतला जाणार आहे.

**संशोधन पेपर मर्यादा-** 'विश्वस्त सिद्धांताचे नव सैद्धांतिक प्रारूप' या संशोधन पेपर मध्ये गांधीजींच्या विश्वस्त सिद्धांताचा व त्यामध्ये बदललेल्या भूमिकेच्या मर्यादेत अभ्यास करण्यात येणार आहे. यामध्ये विनोबा भावे यांनी विश्वस्त सिद्धांताचा केलेल्या विस्ताराचा अभ्यास करण्यात आला नाही.

**विषयप्रवेश -**

महात्मा गांधी यांच्या सर्वोदय विचारांमध्ये सामान्यातील सामान्य व्यक्तीचा विचार करण्यात आला आहे. आर्थिक उन्नती मानवतावादावर आधारित झाली पाहिजे. ती स्पर्धात्मक, यांत्रिकीकरणावर आधारलेली नसली पाहिजे असे गांधीजींचे मत होते. त्यांच्या मते, भारतीय संस्कृती त्यागप्रधान आहे. तिला स्पर्धेऐवजी सहकार्याचे अधिष्ठान आहे. या संस्कृतीमध्ये प्रत्येकाचे व्यवसाय उत्पन्न ठरलेले आहे. माणसाची उन्नती त्याच्या स्वतःच्या हातापायांचा वापर करण्यावर अवलंबून आहे. मोठी शहरे ही मोहाची आगारे असून तेथे श्रीमंत लोक गरीब लोकांचे शोषण करतात असे गांधीजींचे मत होते. म्हणून खेड्यातील जीवनातच संतुष्ट राहिले पाहिजे. आर्थिक जीवनात आपण भौतिक गोष्टींपेक्षा नैतिक गोष्टींना प्राधान्य दिले पाहिजे. गांधी आपल्या आर्थिक विचारांमध्ये शरीरश्रम, साधी राहणी, ग्रामोद्योग, विकेंद्रीकरण, स्वायत्त व स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था या बाबींना प्राधान्य देतात या बाबींवर त्यांचा मृत्यूपर्यंत कायम विश्वास होता. रेल्वे, इस्पितळे, यंत्रे, सैन्य, नौदल, कायदे, न्यायालय यांना स्वराज्यामध्ये स्थान असेल परंतु ते मर्यादित प्रमाणात. रेल्वेचा वापर सैन्य इकडून तिकडे नेण्यासाठी केला जाणार नाही. देशाच्या आर्थिक पिळवणुकीला कारणीभूत ठरणार नाही. रेल्वेचा उपयोग अंतर्गत व्यापार आणि तिसऱ्या वर्गाच्या उतारूना प्रवास सुखकर करण्यासाठी केला जाईल. दवाखाने, रुग्णालये यांचा वापर अतिसेवनाने आजारी पडणाऱ्या लोकांपेक्षा अपघाताने जखमी झालेल्या लोकांच्या सेवेसाठी करण्यात येईल. सैन्य, पगारी नोकर नसून स्वयंसेवकांचे असेल, दुसऱ्या राष्ट्राला अंकित करण्यासाठी सैन्याचा वापर केला जाणार नाही तर शांतता सुव्यवस्था राखण्यासाठी त्याचा वापर केला जाईल. न्यायालय ही व्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी असतील. (खेर, (खंड २): १०) गांधींच्या आर्थिक विचारांमध्ये अपरिग्रह व्रताला स्थान होते. 'गरजा कमीत कमी ठेवा' असा संदेश त्यांनी दिला तो संदेश त्यांनी देशातील श्रीमंत मध्यमवर्गीय व राज्यकर्त्यांना दिलेला होता. भारतासारख्या गरीब राष्ट्रांमध्ये श्रीमंतांनी स्वतःच्या चैनीसाठी संपत्तीची उधळपट्टी करणे हे अनैतिक आहे. तसेच ते समतेच्या तत्त्वाच्या विरोधी आहे असे गांधीजींचे मत होते. दरिद्री व्यक्तीच्या दृष्टीने मात्र आर्थिक उत्कर्ष हीच त्यांच्या नैतिक उन्नतीची पायरी होय. त्यामुळे गरीब दरिद्री व्यक्तीला माणूस म्हणून जगण्यासाठी प्रत्येकाला समतोल आहार, पुरेसा कपडालत्ता, राहण्यासाठी घर, शिक्षण, वैद्यकीय मदत मिळाली पाहिजे, असे गांधी स्पष्ट करतात. गांधी आर्थिक व्यवस्था ही मानवतावादावर आधारलेली असली पाहिजे असे स्पष्ट करतात. गांधींच्या आर्थिक विचारांमध्ये मानवाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि वैद्यकीय मदत यांची पूर्तता झाली पाहिजे असा मानवतावादी दृष्टिकोन आढळतो. समतावादी दृष्टिकोनातून आर्थिक विकासाकडे पाहिले पाहिजे असा त्यांचा दृष्टिकोन होता. जर तुमच्या दृष्टीने समृद्धी याचा अर्थ प्रत्येकाला भरपूर खायला प्यायला मिळावे, कपडालत्ता मिळावा. मनावर

सुसंस्कार घडविण्यासाठी संधी मिळावी, हाच असेल तर माझे समाधान होईल. मात्र अपचन होईल त्याहून अधिक अन्न पोटात ढकलणे आणि उपयोग नसलेल्या वस्तूंचा संग्रह करीत बसणे. मला मुळीच पसंत नाही'. (खेर, (खंड १): १४६). मानवाला त्याच्या सद्गुणांचा विकास करावयाचा असेल तर त्याला शांततेची आवश्यकता असते. आज मानवाची शांतता हरवत चालली आहे, कारण तो भौतिकवादी गोष्टींच्या पाठीमागे धावत सुटला आहे. मानवकेंद्रित व नैतिकतेवर आधारित अर्थव्यवस्था निर्माण केल्यास सर्व मानवजातीला सुखकर आयुष्य जगता येईल असे गांधी स्पष्ट करतात.

**विश्वस्त सिद्धांत** :

दक्षिण आफ्रिकेतून भारतात आल्यानंतर महात्मा गांधीजींनी आपले राजकीय गुरू गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सल्ल्यानुसार संपूर्ण भारत भ्रमण करावयास सुरुवात केली. भारत भ्रमण करत असताना गांधीजींना तत्कालीन हिंदुस्तानमधील प्रचंड दारिद्र्याची समस्या लक्षात आली. तसेच चंपारण येथील शेतकऱ्यांच्या संघर्षावरुन शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात होणारे शोषण ही त्यांच्या लक्षात आले. दुसरीकडे बनारस हिंदू विद्यापीठाच्या उदघाटन प्रसंगी संपूर्ण हिंदुस्थानमधून आलेले राजे, संस्थानिक यांचा श्रीमंती थाट ही भारतातील भिन्न आर्थिक टोके पाहून गांधीजींचे मन विषण्ण झाले. राजकीय चळवळीत सामान्य माणसाचा सहभाग अपेक्षित असेल तर भारतीयांचे दैन्य, दारिद्र्य नष्ट करण्यासाठी तळमळीने झटले पाहिजे असेच गांधींना वाटत होते. जमीनदार, कुळे, मालक, मजूर यांच्यातील संघर्ष अहिंसेच्या मार्गाने सोडवण्यासाठी गांधींनी आर्थिक समानतेच्या दृष्टिकोणातून विश्वस्त सिद्धांताची मांडणी केली आहे. गरीब व श्रीमंत यांच्यामध्ये समन्वय साधण्याच्या दृष्टिकोनातून हा सिद्धांत उपयुक्त ठरतो. केवळ याच मार्गाने समाजातील गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी कमी करता येते असा विश्वास असणाऱ्या लोकांना गांधी अहिंसक मार्गाने चालण्याचा संदेश विश्वस्त सिद्धांताद्वारे देतात.

६ फेब्रुवारी १९१६ रोजी बनारस हिंदू विद्यापीठाच्या उदघाटन प्रसंगी महात्मा गांधींनी जे भाषण केले त्या भाषणांमध्ये त्यांनी विश्वस्त सिद्धांत याविषयी सूतोवाच केले आहे. या भाषणांमध्ये गांधीजी म्हणतात "जवाहराचा व दागदागिन्यांचा त्याग करून भारतातील आपल्या देशबांधवांसाठी त्यांचे विश्वस्त तुम्ही बनल्याशिवाय भारताला स्वातंत्र्य मिळणार नाही." (नटेसन, (१९९३): ३१७) गांधीजींच्या मते, हा पैसा कोणाच्या तरी शोषणामधून आलेला आहे, याची आपण जाणीव ठेवली पाहिजे असे स्पष्ट करतात. समाजातील दुबळ्या लोकांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी नितीनिष्ठ माणसाने पुढे आले पाहिजे, असे गांधीजी मानत असत. त्याच कारणाने त्यांनी चंपारण्य आणि अहमदाबाद येथे शोषितांचे झगडे सुरू झाल्यावर त्यांच्या बाजूने ते उभे राहिले. आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी, उत्पादन साधनांचे केंद्रीकरण होता कामा नये. उत्पादन साधनांचे केंद्रीकरण झाल्यास व्यक्तीस्वातंत्र्याची गळचेपी होते याची गांधींना भीती वाटत होती. श्रमजीवी वर्गाचे शोषण थांबविण्याच्या दृष्टीने तसेच श्रीमंत गरीब यांच्यातील दरी मिटविण्यासाठी, भारतामध्ये जमीनदार, शेतकरी, कारखानदार व कामगार यांच्या मधील वर्ग कलह वाढू नयेत यासाठी गांधींनी विश्वस्त वृत्तीची (Trusteeship Theory) संकल्पना मांडली.

विश्वस्त कल्पनेचा उगम प्युरिटन धर्ममतांमध्ये आहे. जगातील सर्व वस्तूंवर परमेश्वराची सत्ता आहे. माणसाला फक्त त्याचा उपयोग उपजीविकेसाठी करण्याचा अधिकार आहे. माणसाला त्याच्या व्यवसायात तसेच आयुष्यात जे यश प्राप्त होते ते परमेश्वराच्या कृपेने. म्हणून माणसाने या संपत्तीचा स्वतःच्या सुख, भोगासाठी वापर करणे हे पाप आहे, अपरिग्रह वृत्तीने त्याने या संपत्तीतील पैशाचा हिशोब परमेश्वराला चुकता करण्यासाठी झटले पाहिजे, असे या धर्म विचारांमध्ये स्पष्ट केले आहे. प्युरिटन धर्म हा निवृत्तीप्रवण असल्या कारणाने आर्थिक क्षेत्रातही बचत व भांडवलवाढ इतकाच मर्यादित अर्थ होता. गांधींनी यामध्ये बदल करून परमेश्वराऐवजी गरीब, दरिद्री लोक आहेत त्यांच्यासाठी श्रीमंतांनी आपल्या संपत्तीच्या वापर केला पाहिजे, असे स्पष्ट केले. आपण केवळ संपत्तीचे विश्वस्त आहोत ही भावना मनात रुजवावी. आपल्या किमान गरजा भागविण्यासाठी रुपये, उत्पन्न स्वतःसाठी खर्च करावे आणि उरलेल्या सर्व संपत्तीचा विनियोग समाजाच्या कल्याणासाठी करावा असे गांधी विश्वस्त कल्पनेमध्ये स्पष्ट करतात. (पंडित, (१९८३): २५५,२५६) गांधींच्या मते, जोपर्यंत श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी बुजवली जात नाही तोपर्यंत अहिंसक स्वरूपाचे सरकार स्थापन करणे अगदी अशक्य आहे. स्वतंत्र भारतात गरीब लोकांच्या हातात तेवढी सत्ता असेल जेवढी श्रीमंतांच्या हाती असेल. श्रीमंतांनी आपली धनदौलत आणि त्यापासून प्राप्त होणारी शक्ती यांचा स्वेच्छापूर्वक त्याग केला नाही आणि सर्वसामान्य जनतेच्या कल्याणाकरिता गरीब जनतेला आपल्या संपत्तीत भागीदार बनवले नाही, तर एक दिवस नक्कीच हिंसक आणि रक्तरंजित क्रांती होईल. म्हणून जर आपणास हिंसकक्रांती टाळावयाची असेल तर

श्रीमंतांनी आपल्या अतिरिक्त संपत्तीचे आपण स्वतः विश्वस्त बनले पाहिजे असे गांधी स्पष्ट करतात. अहिंसक पद्धतीद्वारे गांधी म्हणतात, आपण भांडवलदारांना नष्ट करण्याचा प्रयत्न करीत नाही तर भांडवलशाहीला नष्ट करण्याचा प्रयत्न करतो. भांडवलदारांनी स्वतःला आपण लोकांचे विश्वस्त आहोत असे समजावे. आपण ज्या लोकांच्याद्वारे भांडवल निर्मितीकरिता, भांडवलाच्या संरक्षणाकरिता आणि वृद्धीकरिता अवलंबून आहोत त्यांचे आपण विश्वस्त म्हणून काम केले पाहिजे. भांडवलात ज्याप्रमाणे शक्ती आहे त्याप्रमाणे श्रमामध्ये देखील शक्ती आहे. शक्तीचा प्रयोग विनाशा करिता ही करता येतो आणि सृजनाकरिताही करता येतो. भांडवल व श्रम हे दोघेही एकमेकांवर अवलंबून आहेत. श्रमिकांना आपल्या शक्तीची जाणीव होताच ते भांडवलदारांचे गुलाम म्हणून न राहता परस्परांचे सहभागीदार असल्याप्रमाणे वागतील असे गांधी अपेक्षित करतात. गांधीजींच्या मते, अंतिमता: भांडवलदाराला नष्ट करण्याचा प्रयत्न केल्यास अखेर श्रमिकाचाच नाश होईल. (यंग इंडिया, (२६/३/१९३१): ४९) विश्वस्त सिद्धांतामध्ये सामुदायिक कल्याण अपेक्षित आहे. गांधींच्या मते, जर एखाद्या व्यक्तीस वारसा हक्कमुळे किंवा व्यापार उद्योगामुळे संपत्ती प्राप्त झालेली असेल तर संबंधित व्यक्तीने ती संपत्ती माझी नाही, केवळ माझा अधिकार सन्माननीय पद्धतीने राहण्याचा आहे. इतरांच्या प्रमाणेच मला राहण्याचा अधिकार आहे. माझ्याकडील अतिरिक्त संपत्ती ही समुदायाची आहे व ती समुदाया करताच खर्च केली पाहिजे. अशी वृत्ती असली पाहिजे. गांधीजींच्या मते, ज्यांच्याजवळ संपत्ती आहे त्यांनी ती संपत्ती गरीबांचे एक विश्वस्त म्हणून त्यांच्याजवळ ठेवावी व त्याचे आचरण करावे. विश्वस्त तथा कायद्याच्या दृष्टीने केवळ एक कल्पना आहे. परंतु लोकांनी यावर नीट विचार केला आणि त्यानुसार आचरण करण्याचा प्रयत्न केला तर जग आज जितक्या प्रेमाने चालवले जात आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रेमाने त्याचे संचालन होईल. संपूर्ण विश्वस्त तथा ही युक्लिडच्या बिंदूप्रमाणे केवळ एक अमूर्त संकल्पना आहे आणि ती व्यवहारात उतरवणे युक्लीडच्या संकल्पने एवढेच अशक्य आहे. परंतु त्या दिशेने आपण जर प्रयत्न करत राहिलो तर या धर्तीवर समता स्थापन करण्याकरिता इतर कोणत्याही विचारापेक्षा आपण अधिक प्रगती करू शकू. गांधी अतिरिक्त संपत्तीचे विश्वस्त बनण्याचा सल्ला देतात. मनुष्याने एक तर अतिरिक्त संपत्तीच प्राप्त करू नये असाही गांधी सल्ला देतात. अतिरिक्त संपत्तीचा विश्वस्त बनणे यापेक्षा संपत्तीची इच्छाच न करणे हे उत्तम. मात्र ज्या श्रीमंत लोकांना पैसे कमावण्याचा मोह सुटत नाही त्या लोकांना गांधी पैशाचा उपयोग लोकांच्या सेवेकरिता करावा असा सल्ला देतात. गांधीजींच्या मते, सामान्यपणे श्रीमंत लोक आपल्या गरजेपेक्षा अधिक खर्च करतात यावर ते जमनालाल बजाज यांचे उदाहरण देतात. त्यांच्या मते, जमनालालजी सामान्य किंवा मध्यमवर्गीय पेक्षाही स्वतःवर कमी खर्च करतात. अनेक श्रीमंत लोक स्वतःवर खर्च करत नाहीत.

श्रीमंतांच्या मुलांनी वारसा म्हणून मिळालेल्या संपत्तीवर आपला हक्क ठेवू नये. श्रीमंत लोकांनी आपल्या मुलांना असे शिक्षण दिले पाहिजे, पालन पोषण अशा प्रकारे केले पाहिजे की, त्यांना आपल्या पायावर उभे राहता आले पाहिजे. श्रीमंत मुलांनी आपल्या पैतृक संपत्तीचा उपभोग न घेता आपल्या स्वकर्तृत्वावर जीवन जगावे. गांधीजींच्या मते, विश्वस्तांचा कोणी वारसा नसतो. जनताच त्याची वारस असते. अहिंसेच्या आधारावर संघटीत राज्यात विश्वस्ततेने नियमन केले जाईल. राजा, जमीनदार यांना इतर श्रीमंतांच्या बरोबरीने गणले जाईल. (हरीजन, (१२/४/१९४२): ११६) गांधीजींच्या मते, जोपर्यंत संपत्तीचा प्रश्न आहे तोपर्यंत संपत्तीधारकांपुढे वर्गयुद्ध किंवा आपल्या संपत्तीचे विश्वस्त स्वेच्छेने बनणे. यामधून कोणत्यातरी एका पर्यायाची निवड करावी लागेल जर त्यांना आपल्या संपत्तीची मालकी टिकवून ठेवण्याची व आपल्या प्रतिभेचा उपयोग करण्याची आणि आपल्या संपत्तीत वाढ करण्याची इच्छा असेल तर त्यांनी शोषण थांबवले पाहिजे. स्वतंत्र भारतात भांडवलदारांना विश्वस्त बनण्याची संधी मिळेल. परंतु विश्वस्ताचा कायदा वरून लादला जाणार नाही तर तो खालून ग्रामपंचायतीपासून तयार करण्यात येईल व लोक सहजपणे तो मान्य करतील. विश्वस्तवृत्तीमध्ये मालक-मजूर व जमीनदार-शेतकरी यांचे संबंध कसे असावेत याबद्दल गांधीजी स्पष्ट करतात, “भांडवलदार किंवा जमीनदार जास्त दिवस स्वामी अथवा मालक बनून राहू शकत नाहीत. जमीनदारांनी गरीब शेतकऱ्यांचे विश्वस्त व्हायला तयार असले पाहिजे तरच त्यांचे भविष्य उज्ज्वल आहे. विश्वस्त नावापुरतेच नाही तर खरोखरच बनावे लागेल. विश्वस्त की जो आपण घेतलेली मेहनत आणि काळजी याचा जो काही मोबदला होईल त्यापेक्षा अधिक काहीही घेणार नाही. तसेच त्यांना त्यांच्या पदावरून कोणीही काढू शकणार नाही.” अहमदाबाद येथील गिरणी कामगारांच्या संपाच्या प्रसंगी मालक व मजूर हे एकाच कुटुंबाचे भाग आहेत असे गांधी स्पष्ट करतात. कामगारांनी कारखानदारांना पित्याच्या जागी कल्पून त्यांच्याकडे सवलतीची मागणी करावी. कारखानदारांनी कामगारांच्या कल्याणाची काळजी घ्यावी व संपाचा मार्ग न चोखाळता दोघांनी आपले तंटे सामंजस्याने, वाटाघाटीने

सोडवावेत अशी गांधी भूमिका घेतात. चंपारण व खेडा जिल्ह्यात जेथे इंग्रज जमीनदार व परकीय शासन यांच्याशी शेतकऱ्यांचा झगडा चालू होता तेथे हा झगडा शांततेच्या मार्गाने चालविण्याचा गांधींनी आग्रह धरला आणि वेळोवेळी वाटाघाटीची तयारी दर्शवली. तरी एकत्र कुटुंबाचीही उपमा त्यांनी तिथे वापरली नाही. यावरून गांधी परकीय भांडवलदारांना विश्वस्त म्हणून स्वीकारत नाहीत किंवा त्यांना स्थान देत नाहीत हे स्पष्ट होते. (नकवी, (१९६९): २१४) असहकाराची चळवळ सुरू झाल्यावर कामगारांना हरताळात भाग घ्यावयाचा असेल तर मालकाची आधी परवानगी घ्यावी असा गांधी सल्ला देतात. मालकाच्या पूर्वपरवानगीने संपामध्ये समाविष्ट व्हावे, असे गांधी स्पष्ट करतात. जमीनदार व कारखानदार लोकांच्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून वागतील ही गांधीजींची आशा १९३० च्या आर्थिक महासंकटानंतर मावळू लागली.

- **विश्वस्त सिद्धांताबद्दल गांधींची बदलती भूमिका :**

१९३० च्या आर्थिक महासंकटानंतर भारतात समाजवादी विचारांचा प्रसार होऊ लागला. श्रमजीवी वर्गाचे शोषण संपुष्टात यावे आणि सामाजिक संपत्तीचा विनियोग समाजाच्या कल्याणासाठी व्हावा या दृष्टीने उत्पादनाची साधने सामाजिक मालकीची असणे आवश्यक आहे, अशी समाजवाद्यांची विचारसरणी होती. गांधींना समाजवाद्यांचे मार्ग पसंत नव्हते तरी विशिष्ट परिस्थितीत उत्पादन साधनांचे राष्ट्रीयीकरण करावे लागेल हे गांधींनीही मान्य केले. १९३७ नंतर प्रांतिक सरकारे अधिकार पदावर आली. सरकारने केलेल्या हस्तक्षेपाला असणारा गांधींचा विरोध कमी झाला आणि कायद्याच्या मार्फत मालकी हक्कात व उद्योगधंद्याच्या व्यवस्थापनात सुधारणा घडवून आणण्यात हरकत नाही. या भूमिकेपर्यंत गांधी पोहचले. विश्वस्त संकल्पनेबाबत आपापसात चर्चा करून गांधीजींचे सहकारी किशोरीलाल मश्रूवाला, नरहरी पारेख आणि प्यारेलाल यांनी ही संकल्पनेत बदल करण्याच्या दृष्टीने एक मसुदा १९४२ साली स्थानबद्ध असताना तयार केला. गांधींनी त्यांच्या मनाप्रमाणे त्यामध्ये फेरफार केल्यानंतर ती योजना प्रसिद्ध केली. या मसुद्याचा अंतिम दस्तऐवज प्रो.एम.एल.दांतवाला यांनी तयार केला होता. या मसुद्यातील ठळक बाबी

१) समाजाच्या वर्तमान भांडवलशाही व्यवस्थेला समतावादी व्यवस्थेत परिवर्तीत करण्याचे विश्वस्त एक साधन आहे. विश्वस्त तथा भांडवलशाहीला सूट देत नाही. परंतु वर्तमान भांडवलदार वर्गाला ती एक संधी देते. मानवी स्वभाव कधीही सुधारणेच्या पलीकडचा नसतो या विश्वासातून विश्वस्तवृत्ती संकल्पनेचा उगम झालेला आहे.

२) संपत्तीच्या खाजगी मालकीचा हक्क आम्ही मानत नाही. समाज स्वतःच्या कल्याणासाठी जरूर तिथे खाजगी मालकीला परवानगी देईल.

३) संपत्तीची मालकी आणि वापर यावर कायदेशीर बंधने घालणे आम्ही वर्ज्य मानीत नाही.

४) शासननियंत्रित विश्वस्त वृत्तीमध्ये कोणाही व्यक्तीला समाजाच्या हिताकडे दुर्लक्ष करून केवळ स्वतःच्या समाधानासाठी संपत्तीचा विनियोग करण्याचे किंवा त्याचा साठा करण्याचे स्वातंत्र्य राहणार नाही.

५) ज्याप्रमाणे कामगाराला जीवनावश्यक किमान वेतन ठरविण्यात यावे असा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे समाजातील कोणाही व्यक्तीचे कमाल उत्पन्न किती असावे यावरही मर्यादा घालणे आवश्यक आहे अशाप्रकारे किमान आणि कमाल उत्पन्नातील भेद वाजवी व मर्यादित असावा आणि हळूहळू हा भेद नष्ट करणे हे उद्दिष्ट ठेवून त्यानुसार वेळोवेळी त्या मर्यादांमध्ये फेरफार करण्यात यावा.

६) गांधीप्रणीत अर्थव्यवस्थेत उत्पादनाचे स्वरूप वैयक्तिक प्रेरणा किंवा लोभ याने न ठरता सामाजिक गरजानुसार ठरवले जाईल.

गांधीजींच्या विश्वस्त सिद्धांताचा विस्तार विनोबा भावे यांनी भूदान आंदोलनाच्या माध्यमातून केला. सदर संशोधनाच्या मर्यादा असल्याकारणाने या ठिकाणी विनोबांची भूमिका स्पष्ट करता येत नाही.

**निष्कर्षात्मक नोंदी-**

१) गांधी विश्वस्त सिद्धांतात मानवाने भौतिक गोष्टींपेक्षा नैतिकतेवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करावा असा आग्रह धरतात. ज्या माध्यमातून गांधीजींना गरीब व श्रीमंत यांच्यामधील आर्थिक दरी दूर करावयाची होती.आर्थिक विचारांमध्ये शरीर श्रम, साधी राहणी, ग्रामोद्योग, विकेंद्रीकरण स्वायत्त व स्वयंपूर्ण ग्राम व्यवस्था या बाबींना गांधी महत्व देतात. ज्या द्वारे श्रमिक वर्गाच्या अर्थव्यवस्थेला गांधी प्रतिष्ठा देतात.

२) विश्वस्त सिद्धांताद्वारे गांधी भांडवलदार व श्रमिक यांच्यामधील संघर्ष दूर करू इच्छितात. भांडवलदार वर्ग स्वतःला श्रमिकांचे विश्वस्त समजावे, असे गांधी आव्हान करतात. श्रमिक वर्गाचे पालकत्व भांडवलदारांनी घेऊन वडील व मुलगा

यांचे नाते भांडवलदार व श्रमिक यांचे विकसित व्हावे अशी अपेक्षा गांधी करतात. भांडवलदार वर्गाच्या विनाशात श्रमिक वर्गाचा देखील नाश आहे हे गांधीजी विश्वस्त सिद्धांताद्वारे श्रमिकांच्या लक्षात आणून देतात.

३) विश्वस्त सिद्धांताद्वारे गांधीजी आर्थिक समता प्रस्थापनेचा प्रयत्न करतात. श्रीमंत वर्गणी वारसा हक्काने मिळालेली संपत्ती नाकारावी असे आव्हान करतात, आर्थिक समतेची उपाययोजना कायद्याद्वारे करून चालणार नाही ती लोकांनी स्वयंप्रेरणेने करावयाची गोष्ट आहे अशी गांधीजींची आर्थिक समते बाबत भूमिका होती.

४) दुसऱ्या महायुद्धानंतर समाजवादी विचारांचा प्रभाव वाढायला लागल्यानंतर गांधीजींनी विश्वस्त सिद्धांतामध्ये बदल केला. उत्पादन साधनांचे राष्ट्रीयकरण करण्यास गांधींनी मान्यता दिली. आर्थिक क्षेत्रात सरकारने हस्तक्षेप करू नये या भूमिकेत गांधीजींनी बदल केला व आर्थिक क्षेत्रात सरकारने काही प्रमाणात हस्तक्षेप करावा हे सूत्र मान्य केले.

५) गांधी विश्वस्त सिद्धांतद्वारे समाजवादी तसेच भांडवलशाही विचारसरणीला पर्याय देतात. भांडवलदार वर्गाला समतावादी समाज निर्मितीसाठी विश्वस्त सिद्धांत ही एक संधी व साधन आहे. आर्थिक संपत्ती वैयक्तिक स्वार्थासाठी प्रेरणा न ठरता सामाजिक गरजेनुसार तिचा विनीयोग करावा. संपत्तीची मालकी व वापर यावरती कायदेशीर बंधन असावे ही भूमिका गांधीजी विश्वस्त सिद्धांताच्या नवप्रारूपामध्ये घेतात.

**संदर्भग्रंथ** –

१) गांधी मो.क., (२००६), हिंदस्वराज्य, नवजीवन प्रकाशन ट्रस्ट,अहमदाबाद.

२) गांधी मो.क., (२०१०), माझे सत्याचे प्रयोग,माणिक प्रकाशन, अहमदाबाद

३) चौसाळकर अशोक, (२००८), हिंदस्वराज्य आणि आत्मबळाची प्राप्ती (प्रथम आवृत्ती), महात्मा गांधी अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

४) नटेसन जी. एन., (१९३३), स्पीचेस् अँड रायटिंगज् ऑफ महात्मा गांधी (चौथी आवृत्ती), चेन्नई.

५) पंडित नलिनी, (१९८३), गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

६) प्रभू आर.के.आणि राव यु.आर., (२०१०) महात्मा गांधींचे विचार, (अनुवाद-हेडा ब्रिजमोहन) नवजीवन प्रकाशन.

७) नटेसन जी. एन., (१९३३), स्पीचेस् अँड रायटिंगज् ऑफ महात्मा गांधी (चौथी आवृत्ती), चेन्नई.